महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
यांचे कार्यालय सी-२४,मित्तल टॉवर,सी विंग,दुसरा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१

GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF FISHERIES
COMMISSIONER OF FISHERIES, MAHARASHTRA STATE,MUMBAI
C-14,Mittal Tower, C-Wing, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400021

दूरध्वनी क्र. २२३५२१०५६१ Tel.No.2235210561

Email :-commfishmaha@gmail.com Website:-http://fisheries.maharashtra.gov.in

---

जा.क्र.मत्स्य/प्रशा/१४२२३८/५०/२०२४ दिनांक :२८/०७/२०२४

प्रति,
नोडल अधिकारी,
IT Hub कक्ष,
आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय,
मुंबई

**विषय: विभागाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत**

सामान्य प्रशासन विभागाच्या शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबतच्या धोरणानुसार आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयात केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत योजना, नाबार्ड, राष्ट्रीय कृषी विकास योजना, मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास योजना तसेच जिल्हा वार्षिक विकास योजना इत्यादी कामासाठी **कार्यकारी अभियंता-०१** पदाची सेवा करार पध्दतीने घेण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे पदांची सेवा देणास इच्छूक उमेदवारांचे अर्ज मागविण्याकरिता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत माहिती व जनसंपर्क संचालनालय कार्यालयास कळविण्यांत आले आहे.

वरील प्रकरणी सविस्तर जाहीरातीचा नमुना (सविस्तर तपशिल, कामाचे स्वरुप, अटी व शर्ती इ.) विभागाच्या **http://fisheries.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर दिनांक ३० /०७ /२०२४ रोजी प्रसिद्ध करुन तसे आस्थापना शाखा, कार्यासन क्रमांक १४ यांना कळविण्यांत यावे.

सोबत : सविस्तर जाहीरातीचा नमुना.

(डॉ.अतुल पाटणे भाप्रसे)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर:
मा.प्रधान सचिव, (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
(स्वीय सहाय्यक कक्षामार्फत)

महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
यांचे कार्यालय सी-२४,मित्तल टॉवर,सी विंग,दुसरा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१

GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF FISHERIES
COMMISSIONER OF FISHERIES, MAHARASHTRA STATE,MUMBAI
C-14,Mittal Tower, C-Wing, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400021

दूरध्वनी क्र. २२३५२१०५६१ Tel.No.2235210561
Email :-commfishmaha@gmail.com Website:-http://fisheries.maharashtra.gov.in

जा.क्र.मत्स्य/प्रशा/१४२२३८/५०/२०२४ दिनांक २६/०७/२०२४

## करार पध्दतीने पदभरती सविस्तर जाहिरात.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबतच्या धोरणानुसार आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयात केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत योजना, नाबार्ड, राष्ट्रीय कृषी विकास योजना, मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास योजना तसेच जिल्हा वार्षिक विकास योजना इत्यादी कामासाठी **कार्यकारी अभियंता-०१** पदाची सेवा करार पध्दतीने घेण्यात येत आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक १२ / ०८ /२०२४ पर्यत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ ते सायंकाळी ०६.१५ पर्यत) आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयास पोहचतील अशा दृष्टीने पाठवावेत. निवड समिती सर्व उमेदवारांची मुलाखत घेवून सर्वानुमते अंतिम निवड करील.

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नाव | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, सी-२४,मित्तल टॉवर,सी विंग,दुसरा मजला, नरीमन पॉईंट मुंबई ४०००२१ |
| पदाचे नाव | कार्यकारी अभियंता |
| आवश्यक पद संख्या | ०१ |
| अर्हता | B.E. Civil |
| अनुभव | विशेष प्राधान्य मत्स्यव्यवसाय संबंधित स्थापत्य क्षेत्रातील कामाचा अनुभव. |
| कामाचे स्वरुप | केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत योजना, नाबार्ड, राष्ट्रीय कृषी विकास योजना, मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास योजना तसेच जिल्हा वार्षिक विकास योजना इत्यादी |
| कालावधी | करार पध्दतीने करार संपेपर्यत |

अटी व शर्ती:

१) उपरोक्त कामासाठी लागणारी विशेष अर्हता तसेच संबंधित कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

२) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०१ वर्षासाठी असेल. अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नुतनीकरण करता येईल आणि एकूण कालावधी ०३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

३) नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यांत येईल.

४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

५) इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी यांनी उपरोक्त कामासाठी ते शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे.

६) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. तसे बंधपत्र/ हमिपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

७) अशा अधिकाऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

८) नियुक्ती प्राधिकारी तथा आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९) सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायीक कामात संबंधित अधिकारी/ कर्मचारी गुंतलेला नसावा.

१०) अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११) करार पध्दतीवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक असेल.

१२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी-शर्ती उमेदवारास लागू राहतील.

(डॉ.अतुल पाटणे भाप्रसे)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य मुंबई